पुणे महानगरपालिका
विधी विभाग,
जा क्र. २०२८
दिनांक:- 26/11/2020

मा. सर्व खाते प्रमुख
पुणे महानगरपालिका

यांजकडेस.....

विषयः- प्रलंबित दाव्याबाबत समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांच्या बैठकीबाबत.

संदर्भः- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ(ज)/से/३५२९, दि. १९/९/२०१४ रोजीचे कार्यालयीन आदेश.

मा. महापालिका आयुक्त यांचे कार्यालयीन आदेश दि. १९/९/२०१४ अन्वये वेगवेगळया खात्यामध्ये वेगवेगळया विषयांवर न्यायालयीन दाव्यासंदर्भात कामकाज पाहण्यासाठी समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांची नियुक्ती व त्या अनुषंगीक करावयाच्या कार्यवाहीचे आदेश तसेच सदर कार्यालयीन आदेशानुसार सर्व खात्याकडील न्यायालयीन दाव्याबाबत विधी विभाग यांनी मनपा पॅनेलवरील वकिलांच्या समवेत तसेच समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) समवेत बैठक घेवून खातेनिहाय प्रलंबित दाव्यांचा आढावा घ्यावा असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार विविध खात्याकडील समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांची दि. ०३/१२/२०२० रोजी दु. ३.३० वा बैठक मा. मुख्य विधी अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये आयोजित केलेली आहे. त्यानुसार सर्व समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांनी आपआपल्या खात्याकडील दाव्यांबाबतची आवश्यक त्या माहितीसह वेळेवर उपस्थित राहावे.

तसेच संदर्भांकित कार्यालयीन आदेशा नुसार विविध विभागाकडील समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतू समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांच्या अन्य खात्यात बढतीने/बदलीने नियुक्ती झाल्यास त्यांच्या जागी सदर खात्यामध्ये बदलीने/बढतीने उपलब्ध करुन दिलेल्या अधिकारी/सेवकाने समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून काम पहावयाचे असून त्यांचे मोबाईल क्र./दुरध्वनी क्रमांक विधी विभागाकडे कळविणे आवश्यक आहे तथापि बहुतेक वेळा बढतीने/बदलीने नियुक्त झालेले समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांचे नाव व मोबाईल क्रमांक/दूरध्वनी क्रमांक नसल्याने संबंधित वकिलांना त्यांच्याशी संर्पक साधने अडचणीचे होते.

तरी आपल्या खात्याकडील समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांची नावे, हुद्दा व मोबाईल क्रमांक/ दुरध्वनी क्रमांक विधी विभागाकडे देणेबाबत संबंधितांना योग्य ते आदेश देण्यात यावेत.

मा.स.कळावे.

27.11.2020

मंजुषा इधाटे
मुख्य विधी अधिकारी
पुणे महानगरपालिका

Scanned with CamScanner